# मृत्युपूर्व जबाब
# Dying Declaration

डॉ. संजय कुंडेटकर,
उपजिल्हाधिकारी
बी.ए; एन.डी.; डी.मॅग; एम.बी.ए;
एम.डी.; पीएच. डी.


Dying Declaration
THE LAW OF LAST WORD

एखादा गुन्हा घडतो तेव्हा त्यात कमीतकमी दोन पक्ष सामील असतात, एक म्हणजे ज्याने गुन्हा केला आहे, म्हणजे आरोपी (accused) आणि दुसरी ती व्यक्ती, ज्याच्यावर गुन्हा केला गेला आहे, म्हणजे पीडित(Victim). तपासानंतर दोन्ही पक्षांना त्यांना स्वत:चा बचाव करण्यासाठी न्यायालयासमोर आणले जाते. परंतु अशी उदाहरणे आहेत जेव्हा पक्षकारांपैकी एकाचा मृत्यू होतो आणि त्यांची भूमिका सिद्ध करण्यासाठी तो न्यायालयात हजर राहू शकत नाही.

मृत्युचे कारण सांगून  मयत व्यक्तीने मृत्यू समयी दिलेल्या निवेदनाला "मृत्युपूर्व जबाब" (Dying Declaration) असे म्हणतात. अशा परिस्थितीत, मयत व्यक्तीने दिलेले, संबंधित वस्तुस्थितीचे विधान कायद्याच्या न्यायालयात एक संबंधित पुरावा बनते.

ज्या सामान्य तत्त्वावर मृत्युपूर्व जबाब मान्य केला जातो ती अशी आहेत की, “मृत्युच्या दारात उभी असलेली व्यक्तीचे मन केवळ सत्य बोलण्याच्या सर्वात शक्तिशाली विचाराने प्रेरित होते अणि त्यामुळे मृत्युच्या दारात उभी असलेली व्यक्ती खोटे बोलत नाही.

ही गोष्ट कायदाही मानतो, त्यामुळे मृत्युपूर्व जबाबाला पुरावा म्हणून फार महत्व आहे.



सर्वसाधारणत: विष प्राशन केलेल्या, गंभीर भाजलेल्या, हल्ल्यात गंभीर झालेल्या, आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती अशा अपघाती प्रकरणात मृत्युपूर्व जबाब नोंदविण्यात येतो.

भारतीय पुरावा कायदा, कलम ३२ अन्वये मृत्युपूर्व जबाबाची व्याख्या दिलेली आहे.

➨ ज्यांना साक्षीदार म्हणून बोलावणे शक्य नसते त्या व्यक्तींनी केलेली कथने

- कलम ३२: जी व्यक्ती मृत्यू पावली आहे किंवा जिचा शोध लागू शकत नाही किंवा जी साक्ष देण्यास असमर्थ झाली आहे किंवा थोडाबहुत विलंब किंवा खर्च झाल्याशिवाय जिला समक्ष हजर करणे शक्य नसून........

त्या प्रकरणाच्या परिस्थितीत तसे करणे न्यायालयाला गैरवाजवी वाटते अशा व्यक्तीने केलेली संबद्ध तथ्यांची लेखी किंवा मौखिक कथने हीच पुढील प्रसंगी संबद्ध तथ्ये असतात :--

- <u>कलम ३२ (१):</u> ज्या कामात एखाद्या व्यक्तीच्या मृत्युच्या कारणाबाबतचा प्रश्न उपस्थित झाला असेल त्या कामात, जेव्हा त्या व्यक्तीने आपल्या मृत्युच्या कारणांसंबंधी किंवा ज्या घडामोडीचे पर्यवसान तिच्या मृत्युत झाले त्यातील कोणत्याही परिस्थिती विशेषासंबंधी कथन केले असेल तेव्हा असे कथन करणाऱ्या व्यक्तीला कथन करण्याच्या वेळी मृत्यू अपेक्षित असला वा नसला तरीही व ज्या कार्यवाहीत तिच्या मृत्युच्या कारणाबाबतचा प्रश्न उपस्थित झाला आहे तिचे स्वरूप काहीही असले तरीही, ती कथने संबद्ध असतात.

फक्त मृत्युपूर्व जबाबाच्या आधारावर न्यायालयांनी आरोपींना शिक्षा सुनावल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे मृत्युपूर्व जबाबाला अनन्य साधारण महत्व आहे.

- मृत्युपूर्व जबाबाचे प्रकार: मृत्युपूर्व जबाब नोंदविण्यासाठी कायद्यात कोणतीही एक विशिष्ट पध्दत विहित केलेली नाही. असा जबाब तोंडी, लेखी, हातवारे करून इत्यादी विविध स्वरूपात नोंदविला जाऊ शकतो. तथापि, मृत्युपूर्व जबाब हा लिखित स्वरूपात आणि अचूक शब्दांमध्ये असावा. मृत व्यक्तीने जसे विधान केले आहे ते तसेच मृत्युपूर्व जबाबात असावे.

- <u>१. तोंडी आणि लेखी:</u> जेव्हा एखादी पीडित व्यक्ती त्याच्या मृत्युचे कारण तोंडी नमुद करते आणि ते लिखीत स्वरूपात नोंदवले जाते ते कायद्याच्या न्यायालयात मान्य असते.

उका राम विरुद्ध राजस्थान राज्य या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने असे मानले की, मयत व्यक्तीने त्याच्या मृत्यूचे कारण म्हणून किंवा त्याचा मृत्यू झाल्याची किंवा त्याच्या मृत्युस कारणीभूत परिस्थितीबाबत केलेली विधाने पुराव्याचा स्वीकार्य भाग असतात.

● २. हावभाव आणि चिन्हे: अनेक प्रकरणांमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने चिन्हे आणि हावभावांचे निरीक्षण नोंदविले आहे, सांकेतिक भाषा कोणासमक्ष नोंदविल्या? कोणते प्रश्न विचारले गेले? हावभाव आणि होकार कसे नोंदविले गेले? प्रश्नांना समजून घेण्यासाठी आणि उत्तर देण्यासाठी पिडीत व्यक्ती मानसिक रित्या तंदुरुस्त होती काय? याचा विचार अशा प्रसंगी करणे अभिप्रेत असते.

राणी-सम्राज्ञी विरुद्ध अब्दुल्ला या प्रकरणात, आरोपीने मृत मुलीचा गळा रेझरने कापला होता ज्यामुळे ती बोलू शकत नव्हती, म्हणून न्यायालयाने असे मानले की जखमी व्यक्तीला बोलता येत नसेल तर ती विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात चिन्हे आणि हातवारे करून जबाब नोंदवू शकतात.

- ३. प्रश्न आणि उत्तर स्वरूपात: प्रश्न-उत्तर स्वरूपात नोंदविलेला जबाब अधिक विश्वासाहार्य मानला जातो. लेखी जबाबामुळे मृत्युपूर्व जबाबाचे मूल्य वाढते.
- ४. अपूर्ण मृत्युपूर्व जबाब: अपूर्ण मृत्युपूर्व जबाब कायद्याच्या न्यायालयात मान्य केला जात नाही. जेव्हा मयत व्यक्ती, त्याच्या मृत्युपूर्व जबाबात मृत्युच्या कारणाबाबत मुख्य वाक्य पूर्ण करण्यात अयशस्वी ठरतो, तेव्हा असा मृत्युपूर्व जबाब अविश्वसनीय ठरतो. तथापि, जर मयत व्यक्तीने त्याच्या मृत्युपूर्व जबाबात संपूर्ण कथा सांगितली परंतु शेवटच्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी तो मयत झाला तर अन्य पुराव्यांचा विचार करून त्याचा मृत्युपूर्व जबाब स्वीकारता येईल.

मुनिप्पन विरुद्ध मद्रास राज्य या प्रकरणात, मृत व्यक्तीने “सर, दिनांक ..... रोजी दुपारी ....वाजता कामनाव कुरेची येथील मुनिप्पनचा मुलगा कोला गौंडन याने माझ्या शरीरावर चाकूने वार केले." असा मृत्युपूर्व जबाब दिला व त्याचा मृत्यू झाला. अशा परिस्थितीत मयताचा मृत्युपूर्व जबाब हा वैध पुरावा मानला गेला कारण मयत व्यक्तीने दिलेले विधान पूर्ण होते तरीही त्याला त्यात आणखी विधाने जोडायची होती.

मृत्युपूर्व जबाब शपथेवर किंवा आरोपीच्या उपस्थितीत नोंदवला जात नाही. अशा मृत्युपूर्व जबाब उलटतपासणीसाठीही उपलब्ध नसतो. असे मानले गेले की, मृत्युपूर्व जबाब अशा स्वरूपाचा असावा की ज्यामुळे न्यायालयाचा त्याच्या अचूकतेवर पूर्ण विश्वास निर्माण होईल. असा मृत्युपूर्व जबाब सत्य आहे आणि तो मयत व्यक्तीने स्वेच्छेने दिला आहे असे न्यायालयाचे समाधान होईल तेव्हाच, कोणत्याही अतिरिक्त पुराव्याची आवश्यकता न ठेवता केवळ मृत्युपूर्व जबाबावर आधारित निर्णय दिला जाऊ शकतो.

**मृत्युपूर्व जबाबाची सत्यता ठरविणारे घटक:**

१. मृत्युपूर्व जबाब देताना मयत व्यक्तीची मानसिक स्थिती सुदृढ होती काय?
२. मृत्युपूर्व जबाब देताना मयत व्यक्तीला कोणाची भिती किंवा दडपण होते काय?
३. मृत्युपूर्व जबाबात काही विसंगती आहेत काय?
४. मृत्युपूर्व जबाब घेणारी व्यक्ती मृत्युपूर्व जबाब नोंदविण्यासाठी सक्षम होती काय?
५. मृत्युपूर्व जबाब, मयत व्यक्तीच्याच अचूक शब्दात नोंदविला गेला आहे काय?

➨ <u>मृत्युपूर्व जबाब देणारी व्यक्ती जिवंत राहिली तर?</u>

जर मृत्युपूर्व जबाब देणारी व्यक्ती अंतिमत: जिवंत राहिली, तर त्याचा जबाब भारतीय पुरावा कायदा, कलम ३२ अन्वये दिलेला जबाब न रहाता तो फौ. प्र. सं. कलम १६२ किंवा १६४ अन्वये जबाब ठरेल आणि पीडित व्यक्ती आरोपीविरुद्ध साक्षीदार होऊन न्यायालयात संपूर्ण हकीकत सांगू शकेल.

## ➨ मृत्युपूर्व जबाब कोण नोंदवू शकते?:

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमिनल अर्ज क्रमांक ९०५/२०१०, दिनांक २.९.२०१० अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्र. सीआरटी-०९/प्र.क्र.२९०/पोल-११, दिनांक १९.१.२०११ अन्वये, काही वेळा निर्माण झालेली तातडी विचारात घेता मृत्युपूर्व जबाब नोंदविण्यासाठी कोणतेही बंधन घालता येणार नाही. कोणत्याही शिक्षीत व्यक्तीकडून मृत्युपूर्व जबाब नोंदविला जाऊ शकतो. शासकीय तथा खाजगी रूग्णालयात, कर्तव्यावर हजर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यासमोरही मृत्युपूर्व जबाब नोंदविला जाऊ शकतो.

- दंडाधिकारी: शक्यतो, जिल्ह्यामध्ये फौ.प्र.सं. कलम १३ अन्वये नियुक्त विशेष न्याय दंडाधिकारी (Special Judicial Magistrate), मुंबईमध्ये फौ.प्र.सं. कलम १८ अन्वये नियुक्त विशेष महानगर दंडाधिकारी (Special Metropolitan Magistrate) मृत्युपूर्व जबाब नोंदवू शकतात. याशिवाय कार्यकारी दंडाधिकारी (Executive Magistrate) आणि विशेष कार्यकारी दंडाधिकारी (Special Executive Magistrate) सुद्धा असे जबाब नोंदवू शकतात. इतर व्यक्तींच्या तुलनेत दंडाधिकारी यांनी नोंदविलेले जबाब अधिक महत्वाचे ठरतात. दंडाधिकारी यांनी नोंदविलेले जबाब फौ.प्र.सं. कलम १६४(५) अन्वये नोंदविलेले असतात म्हणून ते कायद्याच्या न्यायालयात अनुज्ञेय आहेत.

● <u>पोलीस अधिकारी यांच्याकडून</u> :

पोलीस अधिकाऱ्यांनी नोंदविलेल्या मृत्युपूर्व जबाब कायद्याच्या न्यायालयात स्वीकारला जातो.

पोलीस अधिकाऱ्याने नोंदविलेला मृत्युपूर्व जबाब, फौ.प्र.सं. कलम १६२ च्या सामान्य नियमाला अपवाद आहे.



- **<u>डॉक्टरकडून</u> :**

अनेक प्रकरणांमध्ये असे दिसून येते की, वेळेअभावी आणि रूग्णाची बिघडलेली प्रकृती यामुळे, दंडाधिकाऱ्याची वाट पाहणे शक्य होत नाही, त्यामुळे डॉक्टरांनी नोंदवलेले मृत्युपूर्व जबाब कायद्याच्या न्यायालयात मान्य आहे.

मृत्युपूर्व जबाब नोंदविल्यानंतर डॉक्टरने, पिडीत व्यक्तीची मानसिक स्थिती जबाब देण्यास योग्य होती की नाही याबाबत प्रमाणपत्र तयार करावे.



- **<u>सामान्य व्यक्ती/कौटुंबिक सदस्याद्वारे:</u>**

तातडीच्या प्रसंगी मृत्युपूर्व जबाब सामान्य व्यक्ती किंवा मयत व्यक्तीच्या कौटुंबिक सदस्याद्वारे नोंदविला जाऊ शकतो. न्यायालय असा मृत्युपूर्व जबाब नाकारू शकत नाही.

असा मृत्युपूर्व जबाबाला परिस्थितीजन्य पुराव्यांचा आधार घ्यावा लागतो. मृत्युपूर्व जबाबाची नोंद करणाऱ्या व्यक्तीने हे सिद्ध केले पाहिजे की मयत व्यक्ती मृत्युपूर्व जबाब देताना जागरूक मानसिक स्थितीत होती.

## ➨ मृत्युपूर्व जबाब कसा नोंदवावा:

● मृत्युपूर्व जबाब सुरू करण्यापूर्वी डॉक्टरकडून खालील दाखला दिनांक व वेळेसह अवश्य घ्यावा.

‘श्री/श्रीमती --------------- या मृत्युपूर्व जबाब देण्यासाठी शारिरीक आणि मानसिकरित्या सक्षम (compos mentis) आहेत असे मी प्रमाणित करतो.’

डॉक्टरची दिनांकीत स्वाक्षरी:
वेळ:

➨ आणि मृत्युपूर्व जबाब संपल्यानंतर डॉक्टरांकडून

● 'श्री/श्रीमती --------------- यांचा मृत्युपूर्व जबाब घेण्यात आला तेव्हा ते/त्या मृत्युपूर्व जबाब देण्यासाठी मानसिकरित्या सक्षम होते/होत्या. त्यांचा मृत्युपूर्व जबाब त्यांना वाचून दाखविण्यात आला व तो योग्यरित्या नोंदवला आहे असे त्यांनी मान्य केले.'

डॉक्टरची दिनांकीत स्वाक्षरी

वेळ

➨ **मृत्युपूर्व जबाब घेतांना खालील सूचना लक्षात ठेवाव्या.**

- ☞ मृत्युपूर्व जबाब हा डॉक्टर आणि दोन निष्पक्ष साक्षीदारांच्या समक्ष घ्यावा.
- ☞ मृत्युपूर्व जबाब हा मरणोन्मूख व्यक्ती सांगत असल्याप्रमाणे त्याच्या शब्दात लिहून घ्यावा.
- ☞ मृत्युपूर्व जबाब शपथेवर घेतला जात नाही.
- ☞ मृत्युपूर्व जबाब घेतांना, जबाब देणाऱ्या व्यक्तीस काहीही सुचवू नये किंवा सूचक प्रश्न विचारु नये.
- ☞ जबाब देणारी व्यक्ती बोलण्याच्या स्थितीत नसेल तर खुणांनी उत्तरे द्यायला सांगावीत आणि ती उत्तरे खुणा आणि प्रस्तावनेसह लिहून घ्यावीत. अशा वेळी शक्यतो व्हिडिओ चित्रीकरण करावे.

- ☞ जबाब संपल्यानंतर तो जबाब देणाऱ्या व्यक्तीला वाचून दाखवण्यात यावा व तो योग्यरित्या नोंदवला आहे काय? असे विचारून त्यांची मान्यता घ्यावी.
- ☞ जबाब संपल्यानंतर जबाबावर, जबाब देणाऱ्याची स्वाक्षरी आणि अंगठासुध्दा घ्यावा. नंतर त्यावर डॉक्टर व साक्षीदारांची स्वाक्षरी घ्यावी. जबाब देणाऱ्याची स्वाक्षरी/अंगठा घेणे शक्य नसेल तर त्याचे कारण नमुद करावे.
- ☞ जर जबाब घेतांना मधेच जबाब देणारी व्यक्ती मयत किंवा बेशुध्द झाली तर झालेल्या जबाबावर त्याप्रमाणे नमूद करून त्यावर डॉक्टर व साक्षीदारांची स्वाक्षरी घ्यावी.
- ☞ मृत्युपूर्व जबाब घेतांना शक्यतो पोलिसांना हजर ठेऊ नये.

☞ मृत्युपूर्व जबाब सुरू करतांना शक्यतो खालील प्रश्ने विचारून त्यांची उत्तरे या स्वरूपात जबाब देणाऱ्याच्या शब्दात नोंदवावा.

१. तुमचे नाव काय आहे?

२. तुम्ही पूर्ण शुध्दीवर आहात काय?

३. तुम्हाला जबाब द्यायचा आहे काय?

४. मी दंडाधिकारी आहे आणि तुमचा जबाब घेणार आहे हे तुम्हाला समजले आहे काय?

५. तुमची मानसिक स्थिती जबाब देण्यासारखी आहे काय?

६. हा जबाब तुम्ही स्वखुशीने देत आहात काय?

७. तुमच्यावर कोणाचा दबाव किंवा भिती आहे काय?

८. आत्ता तुम्ही कोठे आहात हे माहीत आहे काय? कोठे?
९. तुमचे वय काय आहे?
१०. तुमचा पत्ता काय आहे?
११. घटना कोठे आणि किती वाजता घडली?
१२. काय घटना घडली त्याचे वर्णन करा.
१३. तुमची कोणाविरूध्द तक्रार आहे काय?

अशा प्रकारे जबाब नोंदवून झाल्यानंतर त्यावर स्वत:ची दिनांकीत सही व वेळ नमूद करून मुद्रा उमटवावी. त्यानंतर उपस्थित असलेल्या डॉक्टर व साक्षीदारांची दिनांकीत व वेळ नमूद करून स्वाक्षरी घ्यावी.

जबाबाची मूळ प्रत पोलिसांना प्रत द्‌यावी. एक प्रत स्वत:च्या कार्यालयाच्या अभिलेखात जतन करावी.




डॉ. संजय कुंडेटकर, उपजिल्हाधिकारी